दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४६ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२६ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit ... Epaper Portal

Scan QR code to visit ... Epaper Portal

## आजपासून विधिमंडळाचे अधिवेशन

### खर्चाची तरतूद करणार;राज्याचे अंतरिम बजेट मंगळवारी

**मुंबई-आगामी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता आहे. त्यानंतर लगेच विधानसभा निवडणुका असल्याने सोमवार, २६ फेब्रुवारीपासून राज्य सरकारच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होणार असून २७ रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. यात मोठ्या आर्थिक तरतुदींच्या कोणत्याही मोठ्या घोषणा होण्याची शक्यता नाही.**

फक्त प्रशासनाचे दैनंदिन कामकाज, कर्मचाऱ्यांचे पगार अशा शासकीय खर्चांची तरतूद केली जाण्याची शक्यता आहे. नुकतेच २० फेब्रुवारी रोजी विशेष अधिवेशनात मराठा समाजाला १० टक्के स्वतंत्र आरक्षणाचे विधेयक एकमताने पारित झाले असले तरी विरोधक त्यावर आक्रमक पवित्रा घेण्याची शक्यता आहे. विशेष अधिवेशनात राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावरही विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे.शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी - २९ हजार १६३ कोटी सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास - ४३ हजार ३६ कोटी भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधा विकास - ५३ हजार ५८ कोटी ५५ लाख रोजगारनिर्मिती - ११ हजार ६५८ कोटी पर्यावरणपूरक विकास - १३ हजार ४३७ कोटी



## बोरगाव (आलोडे)मध्ये शिवसेना प्रवेश पक्ष



**पुलगाव । प्रतिनिधी**

बोरगाव (आलोडे )देवळी विधानसभा क्षेत्रातील महिला, पुरुष यांनी शिवसेना(उभाठा )पक्षात प्रवेश घेतला.

वर्धा जिल्हा प्रमुख आशिष पांडे यांच्या अध्यक्षतेखाली आंदोरी जिल्हा परिषद शिवारातील बोरगावं आलोडे या गावातील महिला,पुरुषांनी पक्ष प्रवेश केला. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख आशिष पांडे यांनी पक्ष संघटन वाढीसाठी ग्रामीण भागात शिवसैनिकांना न्यायिक मार्गदर्शन कश्या प्रकारे करावे? याचे मोलाचे मार्गदर्शन आणि पदाधिकारी यांचे महत्व उपस्थिताना सांगण्यात आले. यावेळी बोरगावं आलोडे येथील महिला तसेच पुरुष प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांना शिवबंधन बांधून शिवबंधनाचे महत्व उपस्थित जिल्हा प्रमुखद्वारे सांगण्यात आले.यावेळी गावातील विविध समस्या वर चर्चा करण्यात आल्या. त्या समस्या वर तोडगा काढण्याचे अभिवचन पदाधिकारी यांच्या द्वारे देण्यात आले. प्रवेशपर मार्गदर्शनाच्या वेळी देवळी विधानसभा उपजिल्हा प्रमुख रमेश कडू,विधानसभा समन्वयक ड.विद्याधर माथने, तालुका प्रमुख सतीश बोरसे, उपतालुका प्रमुख अविनाश इंगोले, उपविभाग प्रमुख झाडे यांच्या सह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## संत गाडगे महाराज यांची १४८ वी जयंती साजरी




**पुलगाव । प्रतिनिधी**

देव दगडात नसून माणसात आहे. हे सांगणारे वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज त्यांची १४८ वी जयंती, संत गाडगे महाराज चौक पुलगाव येथे पार पडली.त्यानिमित्ताने गुरुदेव सेवा मंडळाचे राष्ट्रीय कीर्तनकार अशोक भगत यांनी कीर्तनाच्या माध्यमातून संत गाडगेबाबा यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. अंध रुढ्या, अंधश्रद्धा, कर्मकांडापासून दूर राहा. जनतेची सेवा हीच ईश्वर सेवा आहे,आपल्यातील अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षण हे घेतलंच पाहिजे, मनुष्याने नेहमी सावध असले पाहिजे कुठल्याही भोंदूगिरीला बळी पडू नका. हा मोलाचा सल्ला त्यांनी मार्गदर्शनातून दिला. श्यामजी नाकाडे, मनोहरराव जवळकर, हिरामन भाजीपाले, महल्ले गुरुजी, बहादुरकर,सिरसकर महाराज, यांनी यावेळी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन प्रमोद भोंगे यांनी केले. गुरुदेव सेवा मंडळ डी के लेआउटचे सेवक यांनी सेवा दिली.कृष्णराव वाघाडे , चंदू भैसारे, विनोद सयाम, केशव शिंदे, खडसे, घनश्याम महल्ले, जवंजाळ यांनी आपली सेवा दिली. आभार नितीन चंदनमाथे यांनी मानले.कार्यक्रमाचे आयोजनातं भोला प्रसाद चंदन,हरिचंद्र परदेशी, रवी नारायण चंदन, तुलसीदास ठाकूर, अशोक चंदन, व समाज बांधवांनी परिश्रम घेतले राष्ट्र वंदना करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## आदिवासींच्या घराची जागा हक्काची झाल्याने त्यांचे जीवन बदलणार-भाग्यश्री आत्राम

**भामरागड । प्रतिनिधी**

आदिवासी किंवा इतर पारंपरिक वननिवासी हे सुरुवातीपासूनच जंगलांचे संवर्धन करीत आले आहेत. मात्र त्यांना ना हक्काची जमीन, ना सातबारा. केवळ जमीन वाहणे आणि त्यावर उदरनिर्वाह करणे एवढेच त्यांना माहित. आता मात्र शासनाने आदिवासींना वनपट्ट्यांचे मालकी हक्क दिल्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळेल. परिणामी या वनहक्क पट्ट्यांमुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येईल, असे मत माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी व्यक्त केले.





भामरागड तालुका मुख्यालयात आदिवासी लाभार्थ्यांना वनहक्क पट्ट्यांचे वाटप करताना प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.यावेळी तहसीलदार प्रकाश पुप्पलवार, वनपरिक्षेत्र अधिकारी भिसे,भूमिअभिलेख कार्यालय भामरागड चे भुकरमापक अजय मडावी, राष्ट्रवादी काँग्रेसचे भामरागड तालुकाध्यक्ष रमेश मारगोनवार,अहेरी विधानसभा अध्यक्ष लक्ष्मण येरावार,ज्ञानेश्वर भांडेकर, किरण उसेंडी,सब्बर बेग मोगल,घिस्सु आतला,राजू पुंगाटी, साईनाथ गव्हारे तसेच आदी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.मागील काही वर्षापासून अहेरी विधानसभा क्षेत्रातील विविध तालुक्यात प्रलंबित असलेले वन हक्क दावे मंजूर करण्यासाठी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या नेतृत्वाखाली माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांचे प्रयत्न सुरू आहे.नवीन दावे सादर करणे,जुन्या दाव्यातील तृट्यांची पूर्तता करणे तसेच लाभार्थ्यांना घेऊन विविध कार्यालय गाठणे यासाठी त्यांची एक चमू कार्यरत असल्याने येथील बांधवांना वन हक्क पट्टे मिळण्यास मदत होत आहे.नुकतेच भामरागड तालुक्यातील आरेवाडा येथील काही घराचे पट्टे सनद माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते वाटप करण्यात आले.या सनदाचे वापर करून आदिवासी बांधवाना बँकेतून कर्ज पण घेता येईल आणि सर्व शासकीय योजनाचा लाभ पण घेता येणार असल्याचे माहिती यावेळेस देण्यात आले.विशेष म्हणजे या तालुक्यात आतापर्यंत १०१७ वयक्तिक आणि १०१ सामूहिक पट्टे वाटप करण्यात आले आहे हे विशेष.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस कमिटीची भामरागड येथे सभा संपन्न

**भामरागड । प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीचे चाहूल लागताच जिह्यातील सर्वत्र सर्वपक्षीय सभा आयोजित करण्याचे काम जोमाने सुरु आहे. यात भामरागड तालुकाही मागे नाही भामरागड तालुक्यातही विविध पक्षाचे पक्षधर व त्यांचे कार्यकर्ते सतत तालुका मुख्यालयात बैठक व विविध कार्यक्रम घेण्याचे काम करत आहेत तसेच सर्वसामान्यांचे आणि आपल्या पक्षाचे कार्यकर्त्यांचे समस्यांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घेत आहेत तसेच निवडणुकीत भरघोस यश संपादन करता यावे म्हणून तालुक्यातील अनेक पदाधिकाऱ्यांचे पदाचे फेरबदल करण्याचे काम सुरु आहे. त्यानुसार भामरागड तालुका मुख्यालयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहात राष्ट्रवादी युवक काँग्रेस कमिटीचे सभा घेण्यात आले.या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष लीलाधर भरडकर हे होते त्यांनी उपस्थितांना लोकसभा निवडणुकी सोबतच पक्ष बांधणी करून पक्ष बळकटीकरणाचे मंत्र दिले.यावेळी भामरागड तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून महेश मद्देर्लावार यांच्या नावाचे घोषणा करण्यात आले व त्यांनी नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी भामरागड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संपूर्ण ग्रामपंचायतीचे सरपंच, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रमेश मारगोनवार, शहर अध्यक्ष रमेश बोल्लमपल्लीवार, आदिवासी सेवक सब्बर बेग मोगल, जेष्ठ कार्यकर्ते सीताराम मडावी तसेच मोठ्या संख्येत युवा कार्यकर्ते व गावकरी मंडळी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत पुरस्कार घोषीत

**मूल । प्रतिनिधी**




संपुर्ण महाराष्ट्रात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत तालुका स्तरावरील मुल्यांकन होऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाकरीता शिफारशी सादर करण्यात आलेल्या आहेत.

मूल पंचायत समिती अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था गटातून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा डोंगरगाव तर खाजगी व्यवस्थापनाचे शाळांमधून विश्र्वशांती विद्यालय मारोडा यांना गुणानुकमे प्रथम क्रमांक देऊन शिफारस करण्यात आल्याचेपंचायत समिती शिक्षण अधिकारी यांनी कळविले आहे.याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्था गटातून द्वितीय व तृतीय क्रमांक जि.प.पाथमिक शाळा पिंपरी दिक्षित व जि.प.पाथमिक शाळा बोरचांदली तर खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधून देवनील विद्यालय टेकाडी व स्व.इंदिरा गांधी विद्यालय जुनासुर्ला या शाळांची निवड करण्यात आलेली असल्याचे कळते.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत जिल्हा स्तरावर प्रथम, द्वितीय,तृतीय अशी निवड करण्यात येणार असून यातून विभागीय स्तरावर गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय ,तृतीय येणाऱ्या शाळांना रोख रक्कम बक्षीसाचे रूपात देण्यात येणार आहे.मूल तालुक्यात पंचायत समिती अंतर्गत ८बिट असून अंदाजे १४० शाळांना या उपक्रमात सहभागी करण्यात आले होते. या संबंधाने गटशिक्षणाधिकारी पिपरे यांचेशी सविस्तर चर्चा केली असता कामाच्या व्यस्ततेमुळे निवड प्रकिया,मुल्यांकन समिती,यावर बोलण्याचे त्यांनी टाळले.

## निसर्ग सखा संस्थेचे कार्य ईश्वरीय-आ.अडबाले

### १५ व्या वर्धापण दिन सोहळ्यात मान्यवरांची स्तूतीसूमने;विविध कार्यक्रमांनी २ दिवसीय सोहळा संपन्न

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

वाघांचा जिल्हा म्हणून चंद्रपूर जिल्हाची ओळख आहे.मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना ईथे रोजच्याच आहेत.असे असतांना राज्याच्या सिमेवर वसलेल्या गोंडपिपरी तालुक्यासह चद्रपूर आणि लगतच्या गडचिरोली जिल्ह्यात निसर्ग सखामागिल अनेक वर्षापासून कामात आहे.वनविभाच्या मदतीला ही संस्था कायम उभी राहिली.निसर्ग सखासंस्थेची टिम उत्तम काम करित आहे.

या संस्थेचे कार्य ईश्वरीय असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.संस्थेच्या १५ व्या वर्धापण दिन सोहळ्यात मान्यवरांनी स्तूतीसूमने उधळली.सांस्कृतिक,स्पर्धा परिक्षा अश्या विविध कार्यक्रमांनी २ दिवसीय सोहळा गोंडपिपरीत नुकताच संपन्न झाला.

निसर्ग सखा संस्थेने १५ वर्षाच्या या खडतर प्रवासात कित्येक लोकोपयोगी उपक्रम राबविले.कार्यक्रमे घेतली.मानव - वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी पुढाकार घेतला.स्थानिकांना सरपनासाठी जळाऊ लाकूड उपलब्ध व्हावा,यासाठी पाठपूरावा केला.संस्थाध्यक्ष दिपक वांढरे यांनी आजतागायत हजारो सापांना जीवदान दिले.शेकडो अजगर सापांचा यात समावेश राहिला.निसर्ग सखा संस्थेची वाटचाल आणि कार्य कौतूकास्पद असल्याचे सांगत हे ईश्वरिय कार्य असल्याचे मनोगत मान्यवरांनी या महोत्सवात व्यक्त केले.दोन दिवसीय या महोत्सवाच्या पहिल्या दिवशीचे उद्घाटन विधान परिषदेचे आमदार सुधाकर अडबाले यांनी केले.तर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक उद्धव नारनवरे होते.स्वागताध्यक्ष म्हणून प्रा.संतोष बांदुरकर यांची उपस्थिती होती.तर रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात नगरसेवक आणि कृउबासचे संचालक महेंद्रसिह चंदेल अध्यक्षस्थानी राहिले.तर पाहूणे म्हणून शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरज माडूरवार,जेष्ठ पत्रकार संदिप रायपूरे उपस्थित होते.तर दूसऱ्या आणि समारोपीय दिवशीचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केले.तर अध्यक्षस्थानी यंग चांदा ब्रिगेडच्या आदिवासी विभागाचे अध्यक्ष जितेश कुळमेथे होते.यावेळी मंचावर माजी जि.प.सदस्य अमर बोडलावार,सचिन राजूरकर,कृष्णाजी मसराम,राकेश पुन,चेतनसिंह गौर,तुकेश वानोडे,समीर निमगडे,संस्थाध्यक्ष दिपक वांढरे आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पदाधिकारी नेमाजी घोगरे,अमित दुर्गे,शामराव वाग्दरकर,संदीप सरवर,नितीन रायपुरे,अश्विनी वांढरे,कांचन झाडे,सचिन झाडे,कोमल चुधरी,दौलत बल्की,मयूर खरबनकर,पंकज नागापुरे,साईनाथ चौधरी,स्वाती किरमे,सानिका शेंबलकर,अंकिता गेडाम,खुशी चणेकर आदीसह संस्थेच्या समन्वयकांनी परिश्रम घेतले.



# पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यास निलंबित करा

## आ.मेघना बोर्डीकरांची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**जिंतूर । प्रतिनिधी**

पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांच्या गाडीखाली चिरडून तालुक्यातील वरुड (नृ) येथील नागरिकाचा मृत्यू झाला होता मात्र हा अपघात आपल्या वाहनाने झाला नसल्याचा बनाव करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न पोलीस अधिकारी यांच्याकडून करण्यात आला यामुळे संतप्त गावकरी व नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात मृतदेह ठेऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती मात्र न्याय मागणीसाठी आंदोलन करणाऱ्यांवरच गुन्हे दाखल करण्यात आले यामुळे आमदार मेघना बोर्डीकर यांनी पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन पोलीस उपविभागीय अधिकारी पांडुरंग गोफणे यांना निलंबित करण्याची मागणी २३ फेब्रुवारी रोजी केली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील वरुड (नृ) येथील शेतकरी दत्ता डोंबे पोलीस ठाण्याच्या गेट जवळ असताना उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या गाडीने धडक देऊन जखमी केले होते यात जखमी नागरिकांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता दरम्यान अपघात झाला त्यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी पांडुरंग गोफणे स्वतः गाडीत असताना त्या व्यक्तीला उशिरा उपचारासाठी दाखल केले यामुळे त्यांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला तर पोलिसांकडून फिर्यादीला अपघात हा पोलीस अधिकारी यांच्या गाडीने झाला



नसल्याचा बनाव करण्यात आला म्हणून संतप्त गावकऱ्यांनी मृतदेह पोलीस ठाण्यात ठेऊन उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली असताना नातेवाईक व नागरिकांना अरेरावीची भाषा हि पोलिसांकडून करण्यात आली यावेळी घटनेची सीसीटीव्ही फुटेज वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहिल्यावर कळाले की उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या गाडीखाली चिरडल्यामुळे व्यक्तीचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले यावेळी चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला मात्र पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रकरणात हलगर्जीपणा केल्याचे दिसून येत असताना न्यायासाठी मागणी करणाऱ्या नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले यामुळे संतप्त गावकऱ्यांनी आ.मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन प्रकरणात कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली यावेळी आमदार मेघना बोर्डीकर यांनी तातडीने जिल्हा पोलीस अधिक्षक यांची भेट घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी पांडुरंग गोफणे यांची चौकशी करून निलंबित करण्याची मागणी केली.यावेळी अँड.विनोद राठोड,लक्ष्मण बुधवंत,राजेंद्र थिटे, अँड.गोपाळ रोकडे,मदन चव्हाण यांच्यासह वरुड येथील गावकरी उपस्थित होते.

**पोलिसा विरोधात नागरिकांचा संताप का झाला**

उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या वाहनाने अपघात झाला असेल तर वाहनात बसलेल्या उपविभागीय अधिकारी, गार्ड यांनी माहिती का लपवली? अशी चर्चा सध्या शहरात सुरू आहे. यासह गुन्हा लपवणे हासुद्धा गुन्हा च आहे मग सदरील गंभीर घटना घडली असताना पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी घटनेची माहिती आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तात्काळ का कळवली नाही किंवा ठाण्याच्या स्टेशन डायरीत याबाबत तात्काळ नोंद का केली नाही त्यामुळे कायदा हा सर्वसामान्यांना च आहे का ?असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. आपल्या गाडीने अपघात झाला हे माहीत असतानाही तो झाला नसल्याचा कांगावा कशासाठी? जर झालाच नसेल तर मग चालकावर गुन्हा दाखल कसा केला, असे अनेक प्रश्न निरुत्तर करणारे आहेत. सदरील अपघात हा ठाण्यात जाताना गेट मध्ये झाला असताना हा अपघात आपल्या वाहनाने झालाच नसल्याचा बनाव पोलिसांनी का केला ? एवढी गंभीर घटना चक्क उपविभागीय पोलिस अधिकारी यांनीच दडपविण्याचा प्रयत्न करत नातेवाईकांना उडवाउडवीची उत्तरे दिली.

अपघात झाल्यानंतर संबंधित मयत व्यक्तीस रुग्णालयात दाखल करत कुठे ही अपघाताची घटनेची नोंद यावेळी पोलीस अधिकारी यांनी घेतली नाही. यावेळी रुग्णालयात चक्क पोलीस अधिकारी यांनीच त्यास दाखल केल्याचे फोटोही आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

## महानगर भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाची कार्यकारिणी जाहीर

**चंद्रपूर**–भारतीय जनता पार्टी महानगर चंद्रपूर अंतर्गत असलेल्या अल्पसंख्यांक मोर्चाची कार्यकारिणी नुकतीच मोर्चाचे अध्यक्ष चांदभाई सय्यद यांनी जाहीर केली आहे. कार्यकारिणीत महामंत्रीपदी मोसिन शेख, इमरान इकबाल मोहम्मद, नरपिंदर सिंग विरदी, दिपक नन्हेट यांची नियुक्ती करण्यात आली आहे .

उपाध्यक्षपदी जहीर खान कादरी, सोहेल शादिक शेख, ऐतेशाम इकराम खान, जहीरदिन मोहम्मद शेख, जफर सिद्दकी, मो.अलताब अब्दुल तब्बानी, शकील शेख, जम्मु, सादिक शेख मोहम्मद, सलमान इनायत शेख यांना संधी मिळाली आहे.सचिवपदी सलमान इसराईल पठान, साजिद शेख, सय्यद फरदिन सय्यद अमिर, तनविर अब्दुल बशीर, चंद्रशेखर पेरका, शेख अंन्सार अयनुद्दीन शेख, भावना जोसेफ, सोहेल रज्जाक शेख, रेहान शेख यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा , आमदार कीर्तीकुमार भांगडीया , आमदार रामदास आंबटकर , भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंह चंदेल , माजी आमदार प्रा. अतुल देशकर , ड.संजय धोटे, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे , विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी , सुदर्शन निमकर , भाजपा नेते अशोक जिवतोडे जिल्हा महामंत्री डॉक्टर मंगेश गुलवाडे , संध्या गुरूनुले , ब्रिजभूषण पाझारे, राजू गायकवाड,विवेक बोडे, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत , प्रमोद कडू, खुशाल बोंडे , राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर , संजय गजपुरे , नामदेव डाहुले , अनिल डोंगरे, आशिष देवतळे, अरुण मडावी, महेश देवकाते, वंदना शेंडे, गौतम निमगडे, डॉ.अंकुश आगलावे, बंडू गौरकार , इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

## किल्ले संवर्धनासाठी झटणारा बा रायगड परिवार

**मंगळवेढा** – ऐतिहासिक किल्ले संवर्धनासाठी पुरातत्त्व खात्याकडून लक्ष दिले जात नसल्यामुळे या किल्ल्याचे संवर्धन व्हावे, व पुढच्या पिढीला ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी मिळावी या दृष्टिकोनातून पुणे येथील बा रायगड हा परिवार किल्ले संवर्धनासाठी गेली आठ वर्षापासून प्रयत्न करीत आहे.छत्रपती शिवरायांचा इतिहास संपूर्ण जगाला प्रेरणादायी ठरला असतानाच या ऐतिहासिक घटनांच्या साक्षीदार असलेली ठिकाणे व किल्ले सध्या पडझळीमुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत अनेक सामाजिक संघटना किल्ले संवर्धनासाठी पुढे येत आहेत.जेणेकरून या संवर्धनामधून किल्ल्याचे अस्तित्व किल्ल्याच्या खुणा पुढच्या पिढीला दाखवण्यासाठी असव्यात या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत. अशीच एक सामाजिक संघटना पुणे जिल्ह्यातील बा रायगड ही संघटना गेली. आठ वर्षापासून किल्ले संवर्धनासाठी सातारा, पुणे, मुंबई, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या विभागातून प्रयत्न करीत आहे.दर महिन्यातील एका रविवारी या संघटनेच्या माध्यमातून सकाळी नऊ ते दुपारी दोन या कालावधीत हे अभियान राबवले जाते दुपारचे जेवण त्याच गडावरच करून या मोहिमेचा समारोप केला जातो त्यामध्ये सांगली विभागातील सदस्यानी कवठे महांकाळ जवळील जुना पन्हाळा, बहादूरवाडीची गढी,कुळदुर्ग किल्ला, शिवाजी महाराजांचे गुप्तचर असलेले बहिर्जी नाईक यांच्या समाधी स्थळाच्या संवर्धनासाठी त्यांनी अनेक मोहिमा राबवलेल्या आहेत.त्यामध्ये किल्ल्यावरील स्वच्छता, पडझड झालेली ठिकाणे,दिशा दर्शक फलक व माहिती फलक लावणे,स्थळ दर्शक नकाशा लावणे,गडावरील पाण्याची टाकी व तलाव स्वच्छ करणे, त्या ठिकाणी वृक्षरोपण व बंद झालेल्या वाटा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.कुळदूर्ग किल्ल्यावर संवर्धन करीत असताना ११३८ मधील चालुक्य राजा जगदेकमल यांचा शिलालेख सापडला त्यावरील मजकूर सांगली येथील इतिहास संशोधक मानसिंग कुमठेकर यांच्याकडून वाचून घेतला असता त्यातून जुन्या इतिहासकालीन गोष्टीचा बोध झाला.

## ग्रामपंचायत गिरगाव कडुन उच्च प्राथमिक शाळा गिरगाव ला संगणक आणि प्रिंटर्स भेट



**तळोधी(बा ) । प्रतिनिधी**

दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोज शनिवारला जि . प. उ. प्राथ. शाळा गिरगाव येथे ग्रामपंचायत गिरगाव यांनी शाळेला दोन संगणक व प्रिंटर्स भेट दिली.

या उद्धाटन कार्यक्रम प्रसंगी गीता बोरकर सरपंच ग्रामपंचायत गिरगाव तसेच नितीन जयस्वाल ग्रामपंचायत सदस्य ,गेडाम ग्रामपंचायत सदस्य ,अर्चना बोरकर उपाध्यक्ष शा. व्य. स. व माया कामडी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. शाळा डिजिटल झाली पाहिजे, तसेच शाळेला कोणतीही अडचण असल्यास आम्हाला सांगावी ती आम्ही पूर्ण करू असे मनोगतातून सरपंच यांनी व्यक्त केले.

### गरुड झेप अकॅडमी संचालकांच्या त्रासाला कंटाळून

## आत्महत्या करणाऱ्या तरुणीच्या नातेवाईकांचे पोलिसांना साकडे

### फरार आरोपींना तात्काळ अटक करा

**छत्रपती संभाजीनगर**–छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक वसाहत वाळूज मधील गरुड झेप अकॅडमी येथे पोलीस , सैन्यदल प्रशिक्षणाचे शिक्षण घेणारी एकोणावीस वर्षीय युवतीने अकॅडमी मधील संचालकांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली होती . या प्रकरणात संचालकासह पाच जनावर गुन्हे दाखल करण्यात आले . तेव्हापासून संचालकासह पाच जण पोलिसांना चकमा देत फरार आहेत .

अद्याप आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले नाही .

छत्रपती संभाजीनगर येथील गरुड झेप अकॅडमी येथे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या १९ वर्षीय लीना पाटील या युतीने अकॅडमीच्या वसतिगृहातील बाथरूम मध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार मंगळवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आला होता. अकॅडमीत आत्महत्या करणाऱ्या तरुणीने मेस चे वेळेत पैसे न भरल्यामुळे तिला इतर



मुलींसमोर अपमानास्पद वागणूक देऊन, 'तू काळी आहेस,' असे म्हणत अकॅडमीच्या संचालकाने हिणवले होते. हा अपमान सहन न झाल्यानेच तिने आत्महत्या केल्याचा आरोप मुलीच्या वडिलांनी केला आहे. गरुड झेप अकॅडमी चे संचालक निलेश सोनवणे , सुरेश सोनवणे , मॅनेजर राठोड , शुभम गोंगे , मीरा सत्वधर यांच्यावर विविध कलमा नव्हे वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . तेव्हापासून वरील पाच जण फरार आहे . मयत तरुणी लीना पाटील हिच्या सावखेडा ता. पाचोरा .जि . जळगाव येथील नातेवाईकांनी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक यांना साकडे घालीत फरार आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे .

## डोळ्यामध्ये मिरची पावडर टाकून डुकराची गाडी पळवलेले आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

**सेनगाव**–हिंगोली वाशिम महामार्गावर डुकराच्या गाडीला अडवून मिरची पावडर डोळ्यांमध्ये टाकून गाडी पळवणारा तिघांना २५ फेब्रुवारी रोजी हिंगोली स्थानिक गुन्हे शाखे च्या पथकाने शोध मोहीम चालू करून तीन आरोपींना ताब्यात घेतले त्यांच्याकडून पिकप ,कार ,लोखंडी तलवार, खंजीर,असा एकूण पाच लाख ९२ हजार पाचशे रुपयचा मुद्देमाल जप्त केला, नागपूर येथील दोघांनी हिंगोली व परभणी भागात डुकरे खरेदी करून ते पिकप वाहनातून घेऊन जात होते १३ फेब्रुवारी रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास त्यांचे वाहन हिंगोली ते वाशिम रोड वरील एका पेट्रोल पंपा समोर आले असता पाठीमागून दोन कार आल्या त्यातील एका कार पिकप च्या समोर तर दुसरी कार बाजूला लावून वाहन थांबविले त्यानंतर पिकप वाहनातील एकाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून पन्नास डुकरे चोरी केली या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता या घटनेतील चोरट्यांचा शोध घेण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक जी श्रीधर यांनी दिल्या होत्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चोरट्यांच्या मार्गावर होते ही चोरी सेनगाव तील तिघा चोरट्यांनी




केल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती पथकाने १) अर्जुनसिंग छोटुशी सुरकेटाक २) अजयसिंग सुरजीतसिंग सुरकेटाक,( दोघे रा लक्ष्मी नगर सेनगाव) ३) विजय पांडुरंग गायकवाड (रा धुमाळ गल्ली सेनगाव) यांना ताब्यात घेतले त्यांना विचारपूस केली असता सदरील गुन्ह्याची कबुली दिल्याने पोलिसांनी त्यांच्याकडून मालाची रक्कम कार पिकप लोखंडी तलवार खंजीर असा एकूण पाच लाख ९२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला तिघांनाही हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले,

## सोनारी फाटा येथे मराठा समाजाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन



**हिमायतनगर**–तालुक्यातील सोनारी फाटा येथे दिं २४ फेब्रुवारी रोजी १२ वाजण्याच्या सुमारास मनोज पाटील जरांगे यांच्या सुरू असलेल्या मराठा आरक्षणाला समर्थन देवून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे..

महाराष्ट्र सरकारने मराठा आरक्षणाच्या अध्यादेश काढून सगे सोयरे या आदेशाचे पत्र काढून सुद्धा सरकारने खुल्या प्रवर्गामध्ये दहा टक्के आरक्षण देऊन संपूर्ण मराठा समाजाची फसवणूक केली आहे असा आरोप करीत मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातील अनेक गावात सकाळपासून दुपारपर्यंत रास्ता रोको करण्याचे आवाहन केले होते. त्याच आव्हानाला प्रतिसाद देत हिमायतनगर तालुक्यातील सोनारी फाटा येथे राष्ट्रीय महामार्गावर दिं २४ फेब्रुवारी रोजी बारा वाजण्याच्या दरम्यान सोनारी परिसरातील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे या आंदोलनात सोनारी परिसरातील सकल मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होवुन शांतपणे पंधरा ते वीस मिनिटं आंदोलन केले आहेयावेळी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी हिमायतनगर पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक पाटील साहेब यांच्यासह अनेक पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## अजित पवारांनी केली आमदार राहुल कुल यांची मागणी मान्य

### शेती व पिण्याच्या पाण्यासाठी खडकवासला कालव्यातून मिळणार दोन उन्हाळी आवर्तने

**दौंड: –** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली खडकवासला कालवा सल्लागार समितीची बैठक शासकीय विश्रामगृह पुणे येथे दि.२४ रोजी पार पडली.या बैठकीस जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व तसेच जलसंपदा व इतर संबंधित विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. बैठकी दरम्यान खडकवासला कालव्यातून शेती व पिण्याच्या पाण्यासाठी दोन उन्हाळी आवर्तने मिळवीत अशी मागणी केली. तसेच जुना मुठा उजवा कालव्याच्या अस्तरीकरण व दुरुस्तीसाठी निधी मंजुर



करण्यात आला असून त्याचे काम तातडीने सुरु करावे. खडकवासला ते लोणी काळभोरपर्यंत नवा मुठा उजवा कालव्यासाठी भूमिगत बोगदा, जानाई शिरसाई उपसा सिंचन योजना, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या बळकटीकरण आदी अनुषंगाने विविध मागण्या केल्या तसेच शेतकरी व नागरिकांना पाणी टंचाई जाणवणार नाही यासाठी योग्य नियोजन व खबरदारी प्रशासनाने घ्यावी अशी मागणी केली.यावेळी सध्या खडकवासला धरणात १६ टी.एम.सी. पाणी शिल्लक असून, त्याचे योग्य नियोजन करीत शहर व ग्रामीण भागाचा समन्वय साधत, कालव्यातून शेती व पिण्याच्या पाण्यासाठी पहिले आवर्तन दि. ४ मार्च २०२४ पासून व दुसरे आवर्तन ५ मे २०२४ पासून अशा प्रकारे दोन उन्हाळी आवर्तने देण्याचा निर्णय पालकमंत्री अजित पवार यांनी जाहीर केला आहे.अशी माहिती आमदार राहुल कुल यांनी दिली.

# वाचन संस्कृती टिकवण्यासाठी स्थापन व्हावा वाचकांचा क्लब-ना.मुनगंटीवार

## चंद्रपूर जिल्हा ग्रंथोत्सवाचे उद्घाटन ; राज्य भरातील सर्व ग्रंथालये जोडली जावी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ज्या देशात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यांनी अध्यात्मिक, वैचारिक योगदान देताना वाचन संस्कृतीचे, पुस्तकांचे महत्त्व सांगितले. आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमध्ये मात्र दुर्दैवाने वाचन संस्कृती मात्र लोप पावत आहे. ही वाचन संस्कृती टिकवायची असेल तर आपल्याला वाचकांचे क्लब स्थापन करावे लागतील, अशी सूचना वजा अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी २४ फेब्रुवारीला (शनिवार) व्यक्त केली.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सभागृहात येथे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शरदराव सालफळे होते. तर प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी रत्नरक्षित शेंडे, रत्नाकर नलावडे, अनिल बोरगमवार, नामदेव राऊत, प्रा. श्याम मोहरकर, सुदर्शन बारापात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'आज या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा. मानसिक भूक भागविण्यासाठी वाचकांचा क्लब स्थापन करण्याचा विचार करावा. उद्या या सभागृहातील ग्रंथोत्सव चांदा क्लब ग्राऊंडवर होईल तेव्हा मला अधिक आनंद होईल.' ज्याने फेसबुकला जन्म दिला तो मार्क झुकेरबर्ग छान झाडाखाली बसून पुस्तके वाचतोय आणि आपले भारतीय विद्यार्थी फेसबुकवर व्यस्त आहेत, असे मी काही दिवसांपूर्वी व्हॉट्सएपवर वाचले होते. ही खरे तर आपल्यासाठी विडंबनात्मक स्थिती आहे, असेही ते म्हणाले. 'मी आमदार झालो तेव्हा वाचनालय सुरू करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून चंद्रपूर, बल्लारपूर, पोंभुर्णा, मुल व जिल्ह्यात अनेक ठिकाणी वाचनालये सुरू केली. आणखी नवीन वाचनालये सुरू करणार आहे. २०१५ मध्ये माझ्या विभागातर्फे जीआर काढून कार्यक्रमांमध्ये 'बुके नव्हे बुक द्या' असा नियम केला. आता जागा अपुरी पडत आहे, इतकी पुस्तके झाली आहेत. हजारो पुस्तके माझ्याकडे आहेत. मी निवृत्त होईल तेव्हा ही पुस्तकेच माझ्यासाठी धावून येतील,' असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.



### 'ग्रंथालयांमध्ये एकसूत्रता यावी'

" ग्रंथालयांच्या अंतर्गत सर्व व्यवस्थांमध्ये एकसूत्रता आणण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालये एका सॉफ्टवेअरने जोडली तर अधिक सोयीचे होईल. एखाद्या ग्रंथालयात एखादे पुस्तक नसेल तर महाराष्ट्रातील कोणत्या ग्रंथालयात ते उपलब्ध आहे, हे कळू शकले पाहिजे. त्यावर पुस्तकांना रेटिंग देण्याची सोय असावी. अमेझॉनच्या धरतीवर हे काम करणे शक्य आहे, अशा सूचना ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केल्या. जिल्हाभरात जनजागृतीसाठी स्पर्धा घेता येतील का, याचाही विचार करावा, असेही ते म्हणाले.

# पुलगाव जैन समाजाने वाहली संत शिरोमणी विद्यासागर महाराजांना विनयांजली

**पुलगाव । प्रतिनिधी**

जैन धर्मातील संत शिरोमणी विद्यासागर महाराजांचे छत्तीसगढ येथे समाधी निधन झाले.जैन समाजातील ही अपुर्णीय के क्षति असुन, राष्ट्राला आध्यात्मिक दिशा देणारा संत आम्ही हरवला आहे. या पुढे त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालून राष्ट्र निर्माणासाठी अहिंसा मार्गाची कास धरून चालणे.हे तुम्हा आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे.संत हे निर्मोही आणि त्यागाचे जीवन जगत असतात.मान,सन्मान ,पद प्रतिष्ठा हे त्यांचा समोर अत्यंत शूद्र गोष्ट असते.म्हणून संताचा आदर्श समोर ठेवून त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाचे अनुकरण करत जीवन जगण्याचा प्रयत्न करावा,हीच खरी विनयांजली आहे. असे विचार पुलगाव येथील प्रसिद्ध अधिवक्ता दिनेश शर्मा यांनी व्यक्त केले.




वर्धा लोकसभा खासदार रामदास तडस यांनी जैन संत पुजनीय विद्यासागरजी महाराज सामान्य जनतेला उदबोधन करत होतेच. परंतु सकल संत समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. राष्ट्र निर्माणाच्या कार्याच्या मार्गांवरील एक पथीक महाराजांच्या रूपाने आम्ही गमावला या शब्दात आपल्या संवेदना व्यक्त केल्या.यावेळी रमेश सावरकर,अधिवक्ता अशोक भार्गव,प्राध्यापक पहाडे, पंकज पढ्धरिया,प्रफुल दर्डा,अजय बदनोरे, गिरीश चौधरी,नितीन बडगे, ,मनीष साहू सरोज बढजतीया,सुषमा बद्रोरे, भारती झांझरी या सर्वांनी विनयांजली वाहून आपल्या भावना व्यक्त केल्या.सकाळीं ९ वाजता खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरातून मुक रैली काढून कन्हैया मंगल कार्यालय येथे विनयांजली वाहण्यात आली. या प्रसंगी सकल जैन समाजातील सर्व महिला पुरुष मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना सुभाष झांझरी यांनी तर सूत्रसंचालन चंद्रकांत शहाकर यांनी केले. आरती करून कार्यक्रम ची सांगता करण्यात आली.

# घोडायात्रे निमित्य गोपालकाला व महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर चे आराध्य दैवत बालाजी महाराज देवस्थान येथे आमदार बंटीभाऊ भांगडीया तसेच भाजपा पदाधिकार्याकडून चिमूर घोडा यात्रा महोत्सव २०२४ विविध कार्यक्रमाच्या नियोजित स्थळाची पाहणी करण्यात आली आणि भक्ती भावाने गोपाळकाल्यानिमित्त श्रीहरी बालाजी महाराजांचे दर्शन घेतले .



दि. २५ फेब्रुवारी श्रीहरी बालाजी महाराज मंदिर देवस्थान, चिमूर येथे घोडा यात्रा उत्सव गोपाळकाल्यानिमित्त श्रीहरी बालाजी महाराजांचे हजारो भाविक भक्तांनी भक्तिमय वातावरणात मनोभावे दर्शन घेतले. दरम्यान, देवस्थानात ट्रस्टच्या वतीने आमदार बंटीभाऊंचे श्रीहरी बालाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन स्वागत करण्यात आले. तसेच चिमूर घोडा यात्रा महोत्सव २०२४ विविध कार्यक्रमाच्या नियोजित स्थळाची पाहणी केली. संपूर्ण पूर्वतयारी व नियोजनासंदर्भात उपस्थितांशी सविस्तर चर्चा करून आढावा घेतला आणि आवश्यक सूचना दिल्या. त्यांनंतर भाजपाच्या महाप्रसाद वितरण स्टॉलला भेट दिली. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष राजू देवतळे, भाजयुमो प्रदेश सचिव मनिष तुंम्पल्लीवार, भाजपा तालुका महामंत्री प्रशांत चिडे, भाजपा ज्येष्ठ नेते विलास डांगे, भाजपा ज्येष्ठ नेते घनश्याम डुकरे, भाजपा युवा नेते समीर राचलवार, सं.गां.नि.अ.यो. समिती चिमूर अध्यक्ष संजय नवघडे, भाजयुमो शहराध्यक्ष बंटी वनकर, भाजयुमो शहर महामंत्री अमित जुमडे, भाजयुमो शहर महामंत्री श्रेयश लाखे, देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त तथा भाजपा युवा नेते नैनेश पटेल, श्रीहरी बालाजी महाराज बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष शुभम भोपे, परमानंद बोरकर, भाजपा युवा नेते - मनी रॉय, नितेश दोडके, आकाश दुर्गे व अन्य भाजपा पदाधिकारी तथा कार्यकर्ते आणि भाविक बहुसंख्येने उपस्थित होते.

# क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांचे कार्य मानवी कल्याणासाठीच-ना.संजय बनसोडे

**उदगीर-** संत सेवालाल महाराज हे थोर मानवतावादी संत होते. मानवी कल्याणासाठी त्यांनी सर्वदूर मानवता , पर्यावरण रक्षण,गोरक्षाचा संदेश दिला. धर्माच्या रक्षणासाठी त्यांनी निजामाविरूद्ध लढा उभारला होता. समाजातील अनिष्ठ रूढी व शोषणाविरुद्ध त्यांनी आपल्या वाणीतून प्रहार चढवून सामाजिक सुधारणासाठी आग्रही भूमिका घेतली. संत सेवालाल महाराजांनी माणसाला माणुसकी शिकवली. क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांचे कार्य हे मानवी कल्याणासाठीच होते असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते उदगीर शहरात आयोजीत क्रांतीकारी सेवालाल महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी कृषी सभापती बापूराव राठोड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ.गोविंद केंद्रे, बसवराज पाटील नागराळकर, प्रमुख वक्ते विजय चव्हाण, उपसभापती प्रीती भोसले, प्रकाश राठोड, दिलीप गायकवाड, संजय पवार, रामराव राठोड, ज्योती राठोड, सिमा पवार, बसवराज पाटील कौळखेडकर, भरत चामले, मनसेचे जिल्हाध्यक्ष संजय राठोड , श्रीधर राठोड, अजित राठोड, जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष विलास (सिंघम ) जाधव, सचिव संजय नाईक, शिवाजी राठोड, गणेश गायकवाड, उदयसिंह ठाकुर, माजी तहसीलदार राठोड, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, शहरात संत सेवालाल महाराज भवन उभारण्यात येणार असून, यासाठी १५ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. राज्य शासनानेही तांडा वस्ती ग्राम समृद्धी योजनेतून समाजाच्या विकासासाठी चांगला निर्णय घेतला. यातून विकासाला चालना मिळेल. गत वर्षी आपण बंजारा समाजाला शब्द दिला होता हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा या ठिकाणी उभारणार म्हणून तो शब्द पाळला असुन वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा उभारला आहे. लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत आपण या पुतळयाचे अनावरण करणार आहोत. मागील काळात माझ्या फंडातुन संत सेवालाल महाराजांच्या नावाने प्रवेशव्दार उभारले. तांडा वस्ती योजनेतून कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला असुन भविष्यात बंजारासमाजाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे ना.संजय बनसोडे यांनी सांगितले.याप्रसंगी बंजारा समाजातील गुणवंतांचा सत्कार क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्याम राठोड यांनी केले. यावेळी उदगीर तालुक्यातील बंजारा समाजातील सरपंच, प्रतिष्ठित नागरीक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पंचक्रोशीतील सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मानवत तालुक्यात ठिक ठिकाणी सकल मराठा समाजाचे रास्ता रोको आंदोलन

**मानवत । प्रतिनिधी.**

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे यांच्या आदेशानुसार २४ फेब्रुवारी रोजी ठिक ठिकाणी सकाळी १०:३० दुपारी १:०० वाजेपर्यंत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले याच अनुषंगाने मानवत तालुक्यात ठिक ठिकाणी निर्धारित वेळेत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शासनाने विधी मंडळाचे विशेष अधिवेशन बोलावून त्यात मराठा समाजाला अतिरिक १०% आरक्षण दिले आहे. हे आरक्षण देऊन मराठा समाजाची निव्वळ फसवणूक शासनाने केली आहे व हे आरक्षण म्हणजे न टिकणारे आरक्षण आहे त्यामुळे पूर्वी ज्या आरक्षणा संदर्भात सगेसोयरे बाबत आध्यादेश काढला आहे त्याचे रूपांतर तात्काळ कायद्यात करावे व मराठा समाजाला टिकणारे आरक्षण द्यावे या मागणीसाठी आज मानवत तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ वरील रत्नापूर, शहरातील महाराणा प्रताप चौक, रूढी पाटी, देवलगाव आवचार पाटी, तर पाळोदी मार्ग परभणी या मार्गावरील पिंपळा फाटा येथे सकल मराठा समाजाचा वतीने निर्धारित वेळेत एक मराठा लाख मराठा घोषणा देत तीव्र रास्ता रोको आंदोलन केले आंदोलनात सकल मराठा समाज मोठया संख्येने सहभाग झाला होता तर आंदोलनास मानवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपक दंतूलवार यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलनस्थळी तगडा पोलीस बंदोबस्त होता. दरम्यान महा मार्गावरील रत्नापूर येथे वाहनाच्या लांब रांगा लागल्या होत्या.



सकल मराठा समाजाच्या वतीने ठिक ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले दरम्यान ग्रामीण भागाची जीवन वाहिनी समजल्या जाणाऱ्या एस. टी. बसची सेवा सकाळ पासून ठप्प होती मात्र दुपारी १:०० नंतर रास्ता रोको आंदोलन संपताच एस. टी. ची सेवा पूर्वपदावर आल्याने प्रवाशांना ही दिलासा मिळाला.

# बोरी येथे मराठा आरक्षण संदर्भात रस्ता रोको आंदोलन

## जिंतुर परभणी महामार्गावरील बोरी येथे काही काळ वाहतूक ठप्प

**कौसडी । प्रतिनिधी.**

जिंतूर परभणी महामार्गावरील बोरी येथे सकल मराठा समाजाच्या वतीने काही काळ रस्ता रोको आंदोलन करण्यात आला आहे.

दिनांक २४ फेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी दहा वाजता जिंतूर परभणी महामार्गावरील बोरी येथील महावितरण च्या कार्यालयामुळे बोरी व परिसरातील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने सगे सोयरे चा अधिनियम लागू करण्याच्या मागणीसाठी काही काळ रस्ता रोको आंदोलन करण्यात आला या आंदोलनामध्ये परिसरातील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.



मनोज जरांगे पाटील यांनी जी पत्रकार परिषद घेतली त्यानुसार या दोन दिवसात सगे सोयरे चे अधिनियम लागू केले नाही म्हणून महाराष्ट्रभरात जागोजागी रस्ता रोको व इतर आंदोलने करण्यात येत आहे. मराठा आरक्षणासंदर्भात मराठा समाज बांधव आता पेटून उठला आहे ओबीसीच्या कोट्यातून आरक्षण देण्याच्या मागणीवर ठाम आहे. सध्या हे आंदोलने शांततेच्या मार्गाने निघत आहे परंतु शासनाने मराठा आरक्षण संदर्भात सगे सोयरे अधिनियम लागू नाही केले तर हे आंदोलने तीव्र करण्यात येईल असा इशारा देखील मराठा समाज बांधवांच्या वतीने देण्यात आला आहे. जिंतूर परभणी महामार्गावरील बोरी येथे रस्ता रोको आंदोलन करून शासनाचे अधिकारी साखरे व पोलीस उपनिरीक्षक सावंत यांना निवेदन देण्यात आले. या आंदोलनामध्ये बोरी वसा परिसरातील शेकडो मराठा बांधव उपस्थित होते.आंदोलनात बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार शेख गफ्फार, कृष्णा शहाणे, पांडुरंग तूपसुंदर यांच्यासह इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी कडे कोट बंदोबस्त लावले होते.

# बिंझाणी नगर महाविद्यालयाचे एन.एस.एस.शिबीर संपन्न

**नागपूर । प्रतिनिधी**

श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे (एन.एस.एस.)आयोजित साप्ताहिक निवासी शिबीर नुकतेच दि.११ ते १६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत अशोकवन प्रकल्प, वर्धा रोड येथे पार पडले. सहा दिवस चाललेल्या आणि ६८ शिबीरार्थींच्या (४८ मुली व २० मुले) सहभागाने यशस्वी ठरलेल्या या शिबिराचे उद्घाटन सुप्रसिद्ध गायक आणि वक्ते अमर कुळकर्णी यांच्या प्रेरणादायी भाषणाने झाले. कार्यक्रमाचे आणि नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मोहित शाह व संस्थेचे सचिव ड. राजीव देव यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनात हा समारंभ संपन्न झाला. यावेळी श्री. शाह यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना आपली संस्था सर्व प्रकारची मदत करेल असे आश्वासन दिले. संस्थासचिव ड. देव ह्यांनीही शिबीरार्थींना मार्गदर्शन केले. उद्घाटनपर कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजीत मेत्रे यांनी अशा उपक्रमांचे विद्यार्थीजीवनातील महत्त्व आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांस समजावून सांगितले. एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी व शिबीर संयोजक डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून शिबीर आयोजनामागील भूमिका व पार्श्वभूमी विशद केली. दुसरे कार्यक्रम अधिकारी व शिबीर सहसंयोजक डॉ. श्रीकांत शेंडे, अशोकवन प्रकल्प व्यवस्थापक





श्री. विजय पाटील हेही यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन सायली टेकाडे व समीक्षा धांडे या विद्यार्थिनींनी केले तर राजश्री ठवरेने सरस्वतीवंदना व पसायदानाची जबाबदारी सांभाळली. सीमा धुर्वे हिने आभार मानले.

एक भारत श्रेष्ठ भारत : मेरी माटी मेरा देश अशी संकल्पना असलेल्या शिबीरात विविध बौद्धिक सत्रामध्ये श्रीमती मनीषा अतुल, प्रा. विवेक अलोणी, हितेश डफ, डॉ. सुमेधा वानखेडे, डॉ. संदीप तुंडूरवार, डॉ. प्रांजली काणे, डॉ.सुधा जांगिड, डॉ. पल्लवी राजनकर यांनी विविध विषयांवर शिबीरार्थींना मार्गदर्शन केले. सुप्रसिद्ध गायिका डॉ. वैशाली उपाध्ये ह्यांचा वैशिष्ट्यपूर्ण गाण्यांचा गाणे-जीवनगाणे : ऐ जिंदगी हाही कार्यक्रम झाला. १६ ला झालेल्या समारोप आणि गुणगौरव समारंभाचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजीत मेत्रे यांनी, विद्यार्थ्यांना शिबीरात शिकायला मिळालेल्या विविध गोष्टींचा योग्य उपयोग त्यांनी शिबिरानंतरच्या महाविद्यालयीन व सामाजिक जीवनातही करावा आणि त्यांनी तसे केले तरच शिबीराचे आयोजन सार्थक ठरेल असे प्रतिपादन केले. कार्यक्रम अधिकारी व शिबीराचे मुख्य संयोजक डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी आणि कार्यक्रम अधिकारी व सहसंयोजक डॉ. श्रीकांत शेंडे यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. शिबीरार्थी विद्यार्थ्यांपैकी हर्षल पाटील, आकाश मेंढे, साजन शेंडे, प्रतीक्षा राऊत, अजित मसराम, प्रशीक मेश्राम व सृष्टी दांडेकर यांनी समारोपात शिबिरातील अनुभवांचे कथन केले. राजश्री ठवरे व हर्षल पाटील यांनी गायिलेल्या सरस्वतीवंदनेने गुणगौरव समारंभाला सुरुवात झाली. विविध सांघिक व वैयक्तिक स्पर्धेतील विजेत्यांना जवळपास एकूण १८ हजार रूपयांच्या विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट शिबीरार्थी- शिबीर नायक म्हणून हर्षल पाटील व आदेश गजभिये यांची, तर सर्वोत्कृष्ट शिबीरार्थी- शिबीर नायिका म्हणून समीक्षा धांडे व राजश्री ठवरे यांची निवड करण्यात आली. त्यांनी सन्मानचिन्ह व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार प्रांजली मालखेडे व रोशन धनगाये यांना, तर सर्वोत्कृष्ट कलावंत म्हणून जान्हवी कैकाडे, स्वाती वैद्य व साजन शेंडे, सुभाष भुजाडे यांना विभागून पुरस्कृत करण्यात आले. सर्वोत्कृष्ट गट - शिबीरचैतन्यचा रोख पुरस्कार गट क्र १ ला तर उपविजेता गट पुरस्कार गट ६ ला प्रदान करण्यात आला. यासोबतच टॉप टेन शिबीरार्थी म्हणून जान्हवी कैकाडे, सुमीत शेळके, सृष्टी दांडेकर, आकाश मेंढे, गायत्री शाहू, साजन शेंडे, आस्था सोनटक्के, तेजस पाटील, पूर्वा जाधव, आणि रोशन धनगाये यांना रोख पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वा जाधव व रुचिता काळे या विद्यार्थिनींनी केले. खरा तो एकचि धर्म या शिबीरगीताचे विद्यार्थ्यांनी सामूहिक सादरीकरण केले. जयंत वरघने याने आभारप्रदर्शन केले तर राजश्री व हर्षल यांनी म्हटलेल्या पसायदानाने शिबीराची सांगता झाली.

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदकाची मानकरी कु.साची चावरे हिचा

## हंसराज अहीर यांच्या हस्ते सन्मान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मुंबई येथील आंतर्राष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्ण पदकाची मानकरी ठरलेली भद्रावती निवासी कु. साची संदीप चावरे या बालिकेचा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गष्हराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी सन्मान करून तिला क्रीडा क्षेत्रात पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.



कु. साची या ६ व्या इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थीनिने आंतर्राष्ट्रीय कराटे स्पर्धेत उत्कष्ठ प्रदर्शन करून सुवर्णपदकाला गवसनी घातल्याने चंद्रपूर जिल्हयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्या गेला असल्याची प्रतिक्रीया या प्रसंगी हंसराज अहीर यांनी व्यक्त केली असून तीच्या क्रीडा क्षेत्रातील महत्वपूर्ण कामगीरीचा आढावा असाच वर्षध्दंगत होत राहो अशा शुभेच्छा व्यक्त केल्या. कु. साची या विद्यार्थिनीने ज्या आतर्राष्ट्रीय कराटे स्पर्धेत २० ते २५ वजनगटात सहभाग नोंदविला. त्या स्पर्धेत मलेशिया, जपान, इटली, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका या बलाढय देशातील महिला स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत साचीच्या अभुतपूर्व यशामुळे महाराष्ट्र राज्याची मान अभिमानाने उंचावली असून तीच्यावर सर्वच क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या सन्मान कार्यक्रमाप्रसंगी भाजप नेते विजय राऊत, खुशाल बोंडे, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, राजु घरोटे यांचेसह अनेकांची उपस्थिती लाभली होती. सर्वांनी या बालिकेच्या यशाबद्दल कौतुक करून तिला क्रीडा क्षेत्रात भावी काळात उज्वल यश लाभो अशा शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न

## जनतेचे प्रश्न सोडवित मूल तालुक्यात पक्षाला मजबूत करू: मंगेश पोटवार तालुका अध्यक्ष

**मूल । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मुल तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांच्या अध्यक्षतेखाली तालुका आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.




राज्याचे उपमुख्यमंत्री आणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय अजित पवार यांची विकासाची भूमिका आणी नामदार अजित पवार यांनी दिलेला वसा, विकासाचा विचार बहुजनाचा हा संदेश घेऊन मूल तालुक्यातील गावागावात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची शाखा सुरु करण्याचा संकल्प यावेळी उपस्थित कार्यकर्ते आणी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नुकत्याच होणाऱ्या लोकसभा निवडणुकामध्ये महायुतीतील घटक पक्ष म्हणुन जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आणी अजितदादाचे सैनिक म्हणुन निवडणुकीमध्ये मोलाचा वाटा उचलन्याचा निर्धार सर्वांनी करावा. अशी अपेक्षा मूल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी व्यक्त केली.आढावा बैठकीला मुल शहर अध्यक्ष आकाश येसनकर, राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष रोहित कामडे, महिला तालुका अध्यक्ष संगीता गेडाम, महिलांच्या मुल शहर अध्यक्ष धारा मेश्राम,सामाजिक न्याय चे अध्यक्ष गुड्डू निमगडे, ओबीसी आघाडीचे तालुका अध्यक्ष वासुदेवजी पिपरे,तालुका उपाध्यक्ष उमाजी चुधरी, दामोधर सोनुले, वैधकीय मदत कक्षाचे तालुका अध्यक्ष आनंदरावं गोहने,अल्पसंख्यांक आघाडीचे शहर अध्यक्ष आशु खान,सोशल मीडियाचे प्रमुख भावेश रामटेके,सुनील कामडी, वतन चिकाटे, यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी महेंद्र कोडापे, उमाजी चुधरी याच्यावर तालुका उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवीण्यात आली तर रोजगार आघाडीच्या शहर अध्यक्ष पदाची जबाबदारी रजत कुकुडे याच्यावर सोपविण्यात आली. तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले.यावेळी मुलं शहरातील महिला भगिनींनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आणी नामदार अजितदादाच्या विचारवर श्रद्धा ठेवीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश घेतला.यावेळी मुलं तालुक्यातील यश लेनगुरे,सुरज गिरडकर,सौरभ तायडे, सुवर्णा रामटेके, सुनीता सुखदेवे, माला शेंडे ,प्रणय रायपुरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते

# राणी दुर्गावती प्रशिक्षण केंद्रात दिव्यांग प्रणयचा होणार सत्कार

## मान्यवरांच्या उपस्तिथीत विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा होणार सत्कार

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

मरण यातना भोगलेले, मरणाच्या दाढेतून बचावलेले, कठीण परिस्थितीतुन जीवन सावरत इतरांना आदर्श होईल असे जीवनसंघर्ष करीत उत्कृष्ट व्यवसाय करणारे,सह्याद्रीचा राखणदार दैनिकाचे प्रतिनिधी प्रणय केशव बांगरे यांचा सोमवार दिनांक २६ फेब्रुवारीला राणी दुर्गावती प्रशिक्षण केंद्र एरंडी ता- कुरखेडा जिल्हा- गडचिरोली येथे सत्कार होणार आहे.

सदर सत्कार दिव्यांगसाठी काम करणारी महाराष्ट्रातील प्रसिद्ध आम्ही आमच्या आरोग्यासाठी या संस्थेने आयोजित केला आहे यात महाराष्ट्रातील उत्कृष्ट कार्य करणारे समाजसेवक, जेष्ठ कलावंत पदमश्री डॉ. परशुराम खुणे, होम फॉउंडेशन गडचिरोलीचे नागेश मादेशी, महिला राजसत्ता आंदोलन व पंचायत राज प्रशिक्षक गडचिरोलीचे अर्चना जनगणवार,उत्कृष्ट शासकीय अधिकारी जिल्हा रुग्ण कल्याण समितीचे समन्वयक तथा जिल्हा शिकलसेल समन्वयक श्रीमती रचना फुलझेले, अंगणवाडी पर्यवेक्षिका धानोराचे उषा शिवराम चिमुरकर, उत्कृष्ट वयक्तिक व्यवसाय करणारे, प्रणय केशव बांगरे बोन्ड ता. नागभीड जिल्हा चंद्रपूर, भुरकण कन्नाके एकलपूर ता. वडसा जिल्हा गडचिरोली, वंदना विलास वाटेकर दूधमाला ता. धानोरा जिल्हा गडचिरोली,सलीम राजेश मडावी टेमली ता कोरची जिल्हा



गडचिरोली, उत्कृष्ट आरोग्यसखी मंदा साईनाथ पुंघाटे मिचगाव खुर्द ता धानोरा, संध्या अनिल टेकाम अडेगाव ता झरी जिल्हा यवतमाळ, उत्कृष्ट ववनधन केंद्र तुलानमेंढा ता ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर उत्कृष्ट ग्रामसभेत ग्रामसभा रणकट्टा ता कोरची, ग्रामसभा गुजणवाडी उत्कृष्ट शाळा म्हणून जि. प. प्राथमिक शाळा मानेगाव ता लाखांदूर जिल्हा भंडारा, उत्कृष्ट संघटनेत विकास गंगा दिव्यांग संघटना ता लाखांदूर, ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कणेरी यांचाही सत्कार होणार आहे.उत्कृष्ट सामूहिक बचत गटात दुर्गा महिला बचत गट नांदळी ता कोरची, तसेच आदर्श शेतकरी उत्पादक गट आंजनटोला आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान, आणि सत्कार होणार आहे.आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेचे वार्षिक स्नेहमीलन कार्यक्रमात सत्काराचा सोहळा होणार असून जेष्ट सामाजिक कार्यकर्ते व वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी, गोंडवाना विद्यापीठचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे गडचिरोली, सत्यशोधक महिला प्रबोधिनीचे नूतन माळवी वर्धा, युवा कार्यकर्ता आडवोकेट. दीपक चटप चंद्रपूर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हार्दिक कार्यक्रम होणार आहे. दिव्यांगाच्या न्याय हक्क पुनर्वसणासाठी सदर संस्थेचे संयोजक, संस्थापक सदस्य डॉ. सतीश गोगुलवार आणि संस्थापक सदस्य शुभदा देशमुख गेल्या ४० वर्षांपासून अविरत महाराष्ट्रात कार्य करीत आहेत.

# जुगल कटारे यांचे निधन



**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

तळोधी येथील रहिवासी जुगल अनिल कटारे वय ३० हे दिनांक २४ फेब्रुवारीला ११.३० वाजता मरण पावले.ते अविवाहित असून मटण विक्रेते होते. त्यांच्या पश्चात आई,वडील, भाऊ, काका,काकु असा आप्त परिवार आहे.

# १०० टक्के आदिवासी बांधवांना दोन वर्षात घरकुल देणार-आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावीत

## अनुसूचित जमातीच्या विविध योजनांचा लाभार्थी मेळावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक गावापर्यंत रस्ते तसेच गावातील प्रत्येक घरापर्यंत वीज आणि पाणी देण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. राज्य शासन आणि आदिवासी विकास विभागही यासाठी प्रयत्नशील असून येत्या दोन वर्षात १०० टक्के आदिवासी बांधवांना घरकुलचा लाभ देण्यात येईल. घरकुलापासून एकही आदिवासी वंचित राहणार नाही,अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांनी दिली.

चंद्रपूर येथील नियोजन सभागृहात आदिवासी विकास विभागातर्फे आयोजित अनुसूचित जमातीच्या विविध योजनांचा लाभार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर जिल्हाधिकारी विनय गौडा,अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे,नागपूर येथील आदिवासी विकास विभागाचे उपायुक्त जी.एस. कुळमेथे,प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार,हरीश शर्मा,डॉ. मंगेश गुलवाडे, इंगळे,मडावी, रामपालसिंग,सयाराम गोटे आदी उपस्थित होते. आदिवासी जनतेचे प्रश्न समजून ते सोडविण्यासाठी व हा समाज मुख्य प्रवाहात येण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे,असे सांगून मंत्री गावित म्हणाले,घरकुलापासून कोण वंचित आहे, 'ड'यादीत नाव नाही आणि जो पात्र आहे,अशा सर्वांना घरकुल देण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यातील एकही आदिवासी बांधव घरापासून वंचित राहणार नाही. ज्यांच्या जवळ घरकुलसाठी जमीन नाही,त्यांच्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. काही ठिकाणी अधिकारी-कर्मचारी आदिवासी समाजापर्यंत पोहचत नाही तर काही ठिकाणी दळणवळणाच्या सोयी उपलब्ध नाही. त्यामुळे आदिवासी वस्ती,गावे,पोडे



पोहचण्यासाठी बिरसा मुंडा जोडरस्ता योजना सुरु केली आहे.पुढे ते म्हणाले,आदिवासी विकास विभागाने रस्त्यांसाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. तसेच इतर उर्वरीत ठिकाणच्या रस्त्यासाठी व पुलासाठी आणखी निधी दिला जाईल. विजेचा प्रश्न सोडविण्यासाठीसुध्दा निधी दिला जाईल. रस्ता,वीज,पाणी प्रत्येक घरापर्यंत पोहचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. पुढे मंत्री गावित म्हणाले,दरवर्षी एक ते दीड हजार आदिवासी बांधवांना व्यवसाय करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. यापूर्वी फक्त प्रशिक्षण देण्यात येत होते. आदिवासी बांधवांनी आता समोर येणे आवश्यक आहे,आदिवासींच्या कल्याणासाठी हा विभाग मदत करीत आहे,असेही त्यांनी सांगितले. तत्पूर्वी आदिवासी विकास मंत्री श्री. गावित यांच्या हस्ते आदिवासी विकास विभागाच्या नुतन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रास्ताविकातून प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी आदिवासी विकास विभागाचे सादरीकरण केले. तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते बिरसा मुंडा आणि शहीद बाबुराव शेडमाके यांच्या प्रतिमेचे पुजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी केंद्रीय अर्थसंकल्प योजनेंतर्गत २४ लाभार्थी,ठक्करबाप्पा योजनेंतर्गत ७ गावांचे मंजुरी आदेश,घरकुल योजनेंतर्गत ३० लाभार्थी,बचत गटाचे लाभार्थी यांना लाभ देण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन उमेश कडू आणि सपना पिंपळकर यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने लाभार्थी व आदिवासी बांधव उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .